# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप /केंस क्र.६९/२०१६-१७/१८८ दिनांक : १९-०५-२०१७

**आदेश केस क्र.६९ /१६-१७**

| | |
|---|---|
| सौ. मौसमी राहूल आवाडे ,<br>प्लॉट क्र.१४,१५ लक्ष्मी इंड.इस्टेट तिळवणी<br>ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी | **विरुध्द पक्षकार** |
| ३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग ग्रामिण इचलकरंजी | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) उपरोक्त तक्रारदार यांनी प्रस्तुतचे गा-हाणे , त्यांनी ॲम्नेस्टी योजनेत सहभाग घेऊन वीज देयकाची रक्कम भरुन No Dues Certificate घेऊनही त्यांना पुन्हा थकबाकीची रक्कम भरणेस वि.प.तर्फे कळविल्यामुळे , या मंचासमोर दिनांक १८-०३-२०१७ रोजी दाखल केले आहे.

## तक्रारदार यांचे गा-हाणे

२) तक्रारदार यांचे नावे ग्राहक क्र. २५०४९९०१२०२० ची यंत्रमाग वीज जोडणी होती, ती मार्च २०१५ मध्ये बंद करण्यात आली. एकरकमी तडजोडीनुसार त्यांना त्यांच्या विनंतीप्रमाणे सप्टेंबर २०१६ मध्ये व्याजात ५०टक्के सवलत मिळून त्यांना देयक देण्यात आले, परंतु व्याजात १००टक्के सूट देणारी ॲमनेस्टी स्कीम लागू झाली. तक्रारदार यांनी सदरच्या नविन योजनेत सहभाग घेऊन वि.प. यांना दिनांक ०३-११-२०१६ रोजी दिलेल्या नोटीसीप्रमाणे रक्कम रु. ४१,४५०/- दिनांक २१-११-२०१६ रोजी भरणा केली. त्यांना No Dues प्रमाणपत्र प्राप्त झाले. तथापि दिनांक ०९-१२-२०१६ चे रक्कम रु. २६,६९०/- भरण्याबद्दलचे कोटेशन वि.प. यांनी तक्रारदार यांना दिले. सदर देयक तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार अवैध व अन्यायकारक आहे. कृतीमानके विनियमच्या कलम ७.२ च्या तरतूदीचे वि.प. यांनी अल्लंघन केले. वास्तविक दि. ०९-०९-२०१६ चे दिलेले कोटेशन मीटर रिडींग नुसारच दिलेले होते आणि ते तक्रारदार यांनी जमा केले होते. वरील वीज जोडणी एल.टी मल्टीपार्टी अंतर्गत येत होते व परिपत्रक क्र.१५१ लागू होत होते. दोन्ही वीज देयके मीटर रिडींग प्रमाणे दिली किंवा अंदाजे दिली यांचा देयकात खुलासा नाही. वि.प. यांनी पुन्हा मागणी केलेली थकबाकी अयोग्य आहे. ती रद्द करावी अशी तक्रारदार यांनी शेवटी मागणी केली आहे.

## वि.प. यांची भूमिका

३) तक्रारदार यांची यंत्रमाग वीज जोडणी डिसेंबर २०१४ पासून तात्पुरत्या स्वरुपात बंद केली होती. त्यांना त्यानंतर १५ दिवसांची नोटीस देऊन सदर वीज जोडणी थकबाकीपोटी दिनांक १५-०३-२०१५ रोजी कायम स्वरुपी बंद (Lock PDC) करण्यात आली. तक्रारदार यांची इमारत डिसेंबर २०१४ पासून Locked असल्याने मिटर रिडींग घेता आले नव्हते. त्यामुळे रिडींग प्रमाणे वीज देयक झाले नव्हते. त्यानंतर नोव्हेंबर २०१६पासून लागू झालेल्या नवप्रकाश योजनेनुसार तक्रारदार यांनी दिनांक ०४-१०-२०१६ रोजी वि.प. कडे अर्ज केला होता. त्यापूर्वी तक्रारदार यांच्या वीज मिटरचे Final Reading घेण्यात आले होते. योजने अंतर्गत तयार केलेले देयक सप्टेंबर २०१६ च्या थकबाकी वरुन आय.टी.सेंटर कोल्हापूर यांनी काढले होते, ते मिटरच्या Final Reading प्रमाणे नव्हते.फायनल रिडींगप्रमाणे दिलेले फरकाचे देयक तक्रारदार यांनी भरणे आवश्यक आहे आणि ते भरण्याबद्दल त्यांना आदेश करणेत यावा.

४) या प्रकरणाची सुनावणी दि. १६-०५-२०१७ रोजी या मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री विनोद कांबळे आणि वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री एस.व्ही कॅरमकोंडा हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले आहेत. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना थकबाकीच्या फरकाचे डिसेंबर २०१६ मध्ये देण्यात आलेले वीज देयक बेकायदेशीर , अयोग्य व अन्यायकारक असल्याचे तक्रारदार सिध्द करतात काय?

उत्तरः- नाही.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांची उपरोक्त क्रमांकाची लघुदाब यंत्रमाग वीज जोडणी मार्च-२००८ पासून चालू होती. सदर वीज जोडणी वि.प. यांनी दि. २६-०२-२०१५ ची तक्रारदार यांना १५ दिवसांची नोटीस देऊन दि. १५-०३-२०१५ रोजी थकबाकीपोटी कायम स्वरुपी खंडीत केली. तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी , दाखल केलेल्या तक्रारीस अनुसरुन व उपलब्ध कागदपत्रांचे अनुषंगाने तोंडी युक्तिवाद केला आहे. वि.प.तर्फे असे निवेदन करण्यात आले की, तक्रारदार यांनी प्रत्यक्षपणे वापरलेल्या वीजेच्या फरकाची रक्कम वि.प.कडे भरणे आवश्यक असून त्यांना व्याजामध्ये व विलंब शुल्कात १००टक्के सवलत देणेत आली आहे.

७) वि.प. यांचे असे म्हणणे आहे की, डिसेंबर २०१४ पासून तक्रारदार यांचे उद्योग जागेचे शटर बंद (Locked) असल्याने मीटरचे अंतिम रिडींग घेता आले नाही. सदर अंतिम रिडींग दिनांक ०७-०९-२०१६ किंवा ०९-०९-२०१६ रोजी घेण्यात आले. तक्रारदार यांनी दाखल केलेल्या दिनांक ०४-१०-२०१६ च्या पत्रावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांना दिनांक १६-०९-२०१६ रोजी रक्कम रु. ९४,८५०/- चे वीज देयक देण्यात आले होते. याच पत्रात तक्रारदार यांनी स्पष्टपणे कबूल केले होते की, ते थकबाकी पूर्ण भरुन सदर खाते कायमपणे रद्द करणार होते. म्हणजे तक्रारदार यांना थकबाकी मान्य होती. तक्रारदार यांचे वीज मीटर सुस्थितीत होते. याबद्दल वाद नाही. म्हणजेच, सदर मीटरमध्ये नोंद झालेला वीज वापर बरोबर होता असे निश्चित म्हणता येते.

८) दिनांक ०४-१०-२०१६ च्या सदर पत्रात तक्रारदार यांनी नोव्हेंबर २०१६ पासून लागू होणा-या ॲम्नेस्टी स्कीममध्ये (नवप्रकाश योजनेमध्ये) भाग घेण्याची इच्छा दर्शविली होती.

९) डिसेंबर २०१४ पासून तक्रारदार यांचा वीज पुरवठा थकबाकीपोटी तात्पुरता खंडीत करण्यात आला होता. तक्रारदार यांना दिलेले फेब्रुवारी २०१५ चे वीज देयक पाहिले असता असे दिसून येते की, त्याच्याकडून मागिल वीज वापराच्या थकबाकीची (व्याज व विलंब शुल्कासह) रक्कम रु. १,१३,९९०/- मागणी करण्यात आली होती.

१०) तक्रारदार यांनी उपरोक्त योजनेमध्ये सहभाग घेल्यामुळे त्यांना व्याज व विलंब शुल्कामध्ये पूर्णतः सवलत देऊन प्रत्यक्ष वीज वापराचे रु. ४१,४५०/- चे दिलेले देयक त्यांनी दि. २१-११-२०१६ रोजी भरणा केले. या ठिकाणी हे नमूद करणे भाग आहे की, प्रत्यक्ष, वीज वापराची सदरची रक्कम कोणत्या तरी चुकीमुळे कमीा दाखवण्यात आली. फेब्रुवारी २०१५ च्या वीज देयका प्रमाणे प्रत्यक्ष वीज आकाराची रक्कम एक लाखापेक्षा जास्त होती.

११) वरील निवेदनावरुन स्पष्ट होते की, ॲम्नेस्टी योजनेप्रमाणे मागणी केलेली व तक्रारदार यांनी भरणा केलेली रक्कम Final Reading प्रमाणे नव्हती . त्यानंतर दिनाक ०९-१२-२०१६ रोजी तक्रारदार यांना रु. २६,६९०/- चे ५८८४ युनिटच्या फरकाचे देयक वि.प. कडून देण्यात आले. याच देयकाबाबत तक्रारदार यांची तक्रार आहे. परंतु ही तक्रार अवाजवी व अयोग्य आहे असे या अध्यक्षाचे स्पष्ट मत आहे.

१२) तक्रारदार यांनी नवप्रकाश योजनेनुसार दि. २१-११-२०१६ रोजी पूर्ण रक्कम भरल्यानंतर त्या पावतीवर This Receipt will be treated as No dues Ceretifcicate अशी नोंद झाली. तथापि अशी नोंद जनरेट झाल्यामुळे तक्रारदार यांची संपूर्ण वीज वापराची रक्कम भरणेची जबाबदारी संपत नाही. दिनांक ०४-१०-२०१६ च्या पत्रात त्यांनी वीज वापराची थकबाकी मान्य केली होती.

१३) नवप्रकाश योजनेनुसार प्रत्यक्ष वीज वापराची संपूर्ण थकबाकी विशिष्ट कालमर्यादित जमा केल्यास दंड व्याज , विलंब शुल्कात वगैरे प्रमाणबध्द सवलत देण्यात येते. सदर योजने प्रमाणे तक्रारदार यांना दिलेल्या प्रत्यक्ष वीज आकाराच्या देयकात चूक झाल्याचा गैर फायदा तक्रारदार यांना घेता येणार नाही. आमच्या मते Doctrine of Unjust Enrichment चे Indian Contract Act कलम ७० चे तत्व लागू होऊ शकते.

१४) वेळच्या वेळी वीज मिटरचे रिडींग घेण्याची वि.प. यांची जबाबदारी होती हे खरे आहे. तक्रारदार यांचे प्रतिनिधी यांनी कृतीमानके विनियम २०१४ मधील नियम ७.२ चा आधार घेतला. तथापि सदर नियम हा चालू असलेल्या वीज पुरवठयास लागू पडेल असे आम्हास वाटते. डिसेंबर २०१४ पासून तक्रारदार यांच्या व्यवसायाचे शटर Locked होते असे वि.प. म्हणतात.

१५) तक्रारदारतर्फे प्रतिनिधी यांनी वि.पं. यांच्या दि. २५-११-२०११ च्या परिपत्रक क्र.१५१ चा आधार घेतला आहे. तथापि सदरबाबत केलेला युक्तिवाद स्विकारता येत नाही. तक्रारदार यांची वीज आकाराची थकबाकी विद्युत कायदा कलम ५६ प्रमाणे मुदहतबाहय झालेली नाही. आणि तशी त्यांची तक्रारही नाही. तक्रारदार यांचे वीज मिटर रिडींगसाठी वि.प. यांच्या संबंधीत अधिका-यास नेहमी सहजपणे उपलब्ध होते हे दाखविणारा कोणताही पुरावा छायांचित्रे दाखल केली नाहीत. ते काहीही असो , तक्रारदार यांचेकडून येणे असलेली थकबाकी मुदतबाहय झाली नसून वसूलीस पात्र आहे.

१६) वरील सर्व परिस्थितीत आम्हास तक्रारदार यांच्या गा-हाणमध्ये कोणतेही तथ्य दिसून येत नाही. वापरलेल्या वीजेचा संपूर्ण आकाराची थकबाकी भरण्याची तक्रारदार यांची जबाबदारी निश्चितपणे आहे. त्यामुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांच्या दिनांक २०.०२.२०१७ च्या निर्णयात हस्तक्षेप करणे योग्य दिसत नाही.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार यांचे या मंचासमोर दाखल केलेले प्रस्तुतचे गा-हाणे अपिल नामंजूर करण्यात येत आहे. वीज आकार थकबाकीची उर्वरीत रक्मम रु. २६,६९०/- भरणेस तक्रारदार जबाबदार आहेत.

२) तथापि, उपरोक्त रक्कम रु. २६,६९०/- तक्रारदारकडून वसूल झाल्यानंतर त्यांचा ग्राहक क्र. २५०४९९०१२०२० या वीज जोडणीवर अन्य कोणत्याही स्वरुपाची रक्कम वसूलीस पात्र रहाणार नाही.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |